महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्र  ाश ाड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.ध्व .(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.ध्व .३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

---

**क्र. पी.आर-३/ टॅरिफ/२३०८५** **दिनाक : १७/०८/२०१३**

## वाणिज्यीक परिपत्रक क्र. २०५

### विषय : धार्मिक ऊत्सवांना तात्पुरत्या स्वरुपात वीज पुरवठा करण्याबाबत.

महाराष्ट्रामध्ये मोठया प्रमाणात धार्मिक ऊत्सव साजरे केले जातात व त्याकरिता तात्पुरत्या स्वरुपात वीज पुरवठा केला जातो. सदर वीज पुरवठा करतांना सर्वच स्तरावर एकसंघता नसते. तसेच काही ठिकाणी अनधिकृत वीज पुरवठा घेतला जातो.

अशा मंडळांना वीज पुरवठा करण्यात सुसुत्रता आणण्यासाठी खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१) गणेशोत्सव व नवरात्रौत्सव मंडळांना वीज पुरवठा घेण्याकरिता ऑनलाईन सुविधा उपलब्ध आहे. त्याकरिता महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावरुन नवीन वीज पुरवठयाकरिता अर्ज दाखल करता येईल.

२) अर्जदाराने अर्जासोबत खालील आवश्यक कागदपत्रे वेबसाईटवर अपलोड/सादर करावीत.

अ) नवीन वीज पुरवठयाकरिता करावयाचा अर्ज ए-१ प्रपत्र

ब) आवश्यकतेनुसार स्थानिक सक्षम अधिकारी/स्थानिक पोलीस अधिकारी यांचे ना-हरकत प्रमाणपत्र.

क) वीज जोडणीचा चाचणी अहवाल (टेस्ट रिपोर्ट).

३) सद्या अशा धार्मिक ऊत्सवांना धार्मिक कारणाकरिता तात्पुरत्या वीज पुरवठयाचे खालील वीजदर लागू राहील.

| वर्गवारी (धार्मिक कारणाकरिता) | स्थिर आकार (रु. प्रति जोडणी प्रति महिना) | वीज आकार (रु प्रति युनिट) |
|---|---|---|
| लघुदाब | २५०.०० | ३.२७ |
| उच्चदाब | २५०.०० | ३.२७ |

तथापि वरील वीज दरात वेळोवेळी होणारे बदल लागू राहतील.

४) अशा मंडळांना त्याकालावधीकरिता रु.१०००/- प्रति केडब्ल्यु सुरक्षा अनामत रकमेचा भरणा करावा लागेल.

५) अशा धार्मिक ऊत्सवांना कागदपत्रांची पूर्तता व आवश्यक रकमेचा संपूर्ण भरणा केल्यानंतर तीन दिवसांत वीज पुरवठा मंजूर करण्यात यावा व धार्मिक ऊत्सवांच्या आवश्यकतेनुसार व गरजेनुसार वीज जोडणी देण्यात यावी.

६) धार्मिक ऊत्सवांमधे मोठ्या प्रमाणात जनेतेचा सहभाग असतो. यात सर्वांची सूरक्षा अत्यंत महत्वाची असते. यासाठी अधिकृत जोडणी घेणे अत्यंत आवश्यक असते. अनधिकृत वीज जोडणी आढळल्यास अशा मंडळांना दामिनी पथकाव्दारे अपघात टाळण्याकरीता सुरक्षा व वीज चोरीच्या परिणामांबद्दल जाणीव करुन देण्यात यावी व त्यांना अधिकृत विज जोडणी घेण्यास प्रवृत्त करण्यात यावे. या उपरही जे मंडळ अधिकृत वीज जोडणी घेण्यास पुढे येणार नाही अशांचा वीज पुरवठा सुरक्षेच्या दृष्टीने ताबडतोब बंद करण्यात यावा व नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

७) अधिकृत व माफक वीजदराचा धार्मिक कारणाकरिताच असलेला वीज पुरवठा जास्तीत जास्त गणेशोत्सव व नवरात्रौत्सव मंडळांना देण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयामार्फत प्रयत्न करण्यात यावे.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना याबाबत कळविण्यात येते की, वरीलबाबत त्यांच्या कार्यक्षेत्रात येणा-या सर्व धार्मिक ऊत्सव आयोजित करणा-या मंडळांना/संस्थांना अवगत करुन देण्यात यावे. वीज जोडणी देतांना सुरक्षेच्या दृष्टीने काळजी घेऊन वीज जोडणीचे ठिकाण योग्य ठरविण्यात यावे.

डॉ.पि.सो.कुले

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

प्रत :-
प्रेषण यादीप्रमाणे.